**प्रेस नोट** **दि.१८/०७/२०१९**

## वानवडी पोलिस स्टेशन पुणे शहर

### आय.एम.आय.नंबर वरून मोबाईल मालकाचा शोध घेऊन मोबाईल परत केला

दिनांक १६/०७/२०१९ रोजी पोलीस शिपाई शिरीष गोसावी यांना वानवडी परीसरात झुडपात टाकलेला एक बेवारस मोबाईल मिळून आला त्यामधील सिमकार्ड काढुन टाकलेले होते. सदर मोबाईलचे मालकाचा शोध घेणेकामी सहा.पोलीस फौजदार श्री. प्रदिप गुरव व पोलीस नाईक ज्ञानेश्वर गिरमकर यांनी आय.एम.आय. नंबरवरून मोबाईल मालक खेमराज अनिल उबाळे रा. १२५/१/ए, राज सोसायटी, एल.आय.सी. कॉलनी, कोथरूड, पुणे. यांचा नाव पत्ता मिळालेने त्यांचेशी वरील कर्मचारी यांनी संपर्क साधुन त्यांना वानवडी पोलीस स्टेशन येथे बोलावून सदर मोबाईल विषयी विचारणा केली असता त्यांनी सदरचा मोबाईल स्वारगेट परिसरातून त्याचेकडून हारवला असलेबाबत सांगीतले. व त्याबाबत स्वारगेट पोलीस स्टेशन येथे मिसींगची तक्रार दिली असल्याचे सांगीतले. सहा.पोलीस फौजदार गुरव यांनी तसे स्वारगेट पो.स्टे.ला खात्री केली असता स्वारगेट पोलीस स्टेशन येथे मिसींग दाखल असल्याचे समजले. सदरचा मोबाईल त्यांनी खेमराज उबाळे यांचे ताब्यात दिला त्यावेळी उबाळे यांनी पोलीसांचे कार्यतत्परते बाबत आनंद व्यक्त करून आभार मानले.